# वसई-विरार शहर महानगरपालिका
## घनकचरा व्यवस्थापन विभाग

दि.२३/०४/२०२४

### महामार्गावरील जलभरावाची समस्या दूर करण्यासाठी उपाययोजना
### महापालिका, महामार्ग प्राधिकरणाचा संयुक्त दौरा

महामार्गावर पाणी साचून वाहतूक कोंडीची समस्या होत असते. ही समस्या सोडविण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी वसई विरार शहर महापालिकेने महामार्ग प्राधिकरण आणि वाहतूक पोलिसांबरोबर नुकताच मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर पाहणी दौरा केला. या विशेष पथकाने यावेळी महामार्गावर पाणी साचण्याची कारणे काय त्याचा शोध घेतला. यावेळी महापालिकेने महामार्गप्राधिकरणाला महामार्गावरील पाण्याचा निचरा होण्यासाठी विविध कामे करण्याचे निर्देश दिले. यामध्ये नाल्यांचे रुंदीकरण, नालेसफाई आदी विविध कामांचा यात समावेश आहे.

पावसाळ्यात मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर पाणी साचून महामार्ग जलमय होत असतो. यामुळे वाहतूक कोंडी होऊन वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. ही समस्या दूर करण्यासाठी वसई विरार महापालिकेने प्रयत्न सुरू केले आहेत. महापालिकेने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) आणि वाहतूक पोलीस यांच्या अधिकाऱ्यांसोबत नुकताच एक संयुक्त पाहणी दौरा आयोजित केला होता. आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, उपायुक्त नानासाहेब कामठे, उपायुक्त समीर भूमकर, कार्यकारी अभियंता प्रदीप पाचंगे, कार्यकारी अभियंता प्रकाश साटम, प्रभाग समिती 'जी' च्या प्रभारी सहाय्यक आयुक्त मनाली शिंदे, उपअभियंता सुरेश शिंगाणे, प्रभाग समिती 'जी' चे वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक प्रभाकर धुमाळ, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे ठेकेदार, सुमीत कुमार, वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक जाधव साहेब आदी या दौऱ्यात सहभागी झाले होते.

वासमारे पूल, सनशाईन हॉटेल जवळील नाला, न्यू फाऊंटन सिटी हॉटेल, कोहिनूर मार्बल जवळील नाला, सेल्फी ढाबा, कच्छ दरबार ढाबा, टीएनटीच्या बाजूचा नाला आदी ठिकाणी या पथकाने भेट देऊन पाहणी केली. नाले साफ करणे, आरसीसी पाईप गटारे स्वच्छ करून घेणे, नाल्यांचे रुंदीकरण करणे, राडारोडा साफ करणे, पाणी जाण्याचे मार्ग मोकळे करणे, महामार्गाच्या रस्त्याच्या बाजूने चर मारून घेणे, माती भराव असलेल्या जागा मोकळ्या करणे आदी कामांचे नियोजन करण्यात आले. महामार्गाच्या हद्दीतील कामे करण्याचे निर्देश महापालिकेने महामार्ग प्राधिकरणाला दिले. तसेच पालिका हद्दीतील महामार्गालगतच्या नाल्यांची सफाई, कल्व्हर्ट तयार करणे आदी कामे महापालिकेकडून करण्यात येणार आहे. तात्काळ या कामांना सुरवात करण्यात आली आहे. यासाठी आवश्यक ती यंत्रसामुग्री पुरविण्यात आली आहे. या कामांवर पालिकेचे अधिकारी लक्ष ठेवून काम करवून घेणार आहेत. ज्या जागा ग्रामपंचायतीच्या हद्दीत आहेत तेथे काम करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे पत्रव्यवहार केला जाणार आहे.

महामार्ग पाण्याखाली का जातो त्या कारणांचा शोध या पाहणी दौऱ्यात घेण्यात आला आणि त्यानुसार कामांची नियोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने पाणी जाण्याचे बंद झालेले मार्ग मोकळे करणे, नाल्यांचे रूंदीकरण करून नाल्यांची साफसफाई करणे आदी कामांचा समावेश आहे, अशी माहिती पालिकेचे उपायुक्त (घनकचरा) नानासाहेब कामठे यांनी दिली. प्राधान्याने ही कामे करवून घेतली जाणार असून येत्या पावसाळ्यात महामार्गावरील जलभरावाची समस्या दूर केली जाणार असल्याचेही कामठे यांनी सांगितले.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**